# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## सामान्य प्रशासन मुख्यालय
## जाहिरात

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना शासन निर्णय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संकीर्ण २०२४/प्र. क्र. ९०/व्याशी -३, दि.०९ जुलै २०२४ अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत ०६ महिन्याच्या कालावधी करिता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी २१० पदांसाठी पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवाराकडून दिनांक १६/०८/२०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

विद्यावेतन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | प्रति माह विद्यावेतन रुपये |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु.६०००/- |
| २. | आय.टी.आय/पदवीका | रु.८०००/- |
| ३. | पदवीधर/पदव्युत्तर | रु.१००००/- |

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी :** जाहिरात प्रसिध्दी दिनांक पासून **दि. १६/०८/२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेत (सदर शैक्षणिक अर्हता व इतर माहिती **https://bncmc.gov.in** या भिवंडी **निजामपूर शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.)**

**अटी व शर्ती-**

१. इच्छुक उमेदवाराची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विद्यावेतनावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी नेमणूक करावयाची आहे. इच्छुक उमेदवारांना विद्यावेतना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा व भत्ते अदा केले जाणार नाहीत.

२. इच्छुक उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा आदेशाच्या दिनांका पासून असेल व ते प्रत्यक्ष हजर होतील त्या तारखेपासून ६ महिन्याकरिता राहिल इच्छुक उमेदवारांचा नियुक्ती कालावधी प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल. त्यापुढे त्यांना या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत किवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा अधिकार व हक्क राहणार नाही.

३. इच्छूक उमेदवारांनी आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक, मेल आयडी / शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख इ. तपशिलासह विहीत नमुन्यात उप-आयुक्त सामान्य प्रशासन यांचेकडे अर्ज सादर करावा,

**नोटः-** या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत रोजगार मेळावा **दि. १६/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत, स्व. विलासराव देशमुख सभागृह, तीसरा मजला येथे आयोजित केला असून ऑफलाईन अर्ज भरणे व **https://rojgar.mahaswayam.gov.in/** स्वयम पोर्टलवर नोंदणी केली जाणार आहे, तरी इच्छुक उमेदवारांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर महानगरपालिका, भिवंडी**

https://freesarkaariresult.in/